महाराष्ट्र शासन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, परभणी

कार्यालय ईमेल पत्ता: Gmcparbhani@gmail.com आयटीआय परिसर जिंतूर रोड परभणी कार्यालय दुरध्वनी क्रं. ०२४५२ २९९२९४

जा.क्र.शावैमवरुप/आस्था/प्रत्यक्ष मुलाखती/कंत्राटी पदभरती/ 1561 /२०२६, | दिनांक - 30/०९/२०२६

निवासी वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ पदे कंत्राटी स्वरुपात भरणे.

प्रत्यक्ष मुलाखती

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील आस्थापनेवरील निवासी वैद्यकीय अधिकारी वर्ग-०२ संवर्गातील ०२ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदावर नियमित उमेदवार मिळेपर्यंत व भविष्यात पुढील एक महिण्यात रिक्त होणारे पदा करीता निवासी वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ (कंत्राटी पदे) (१२० दिवसांकरिता तात्पुरत्या स्वरुपात) प्रशासकीय कामकाज व रुग्णहित लक्षात घेवुन पदे भरण्याकरीता दिनांक ०६ ऑक्टोबर २०२६ रोजी वेळ सकाळी ११.३० वाजता प्रत्यक्ष मुलाखती ठेवण्यात येत आहे. तरी उमेदवारांनी दिनांक ०६/१०/२०२६ रोजी नियोजीत वेळेत मुलाखतीस हजर राहावे. शासनाने वेळोवेळी नेमुन दिलेल्या नियम व अटि व शर्ती तसेच शासन निणर्य लागु राहतील. उपस्थित उमेदवारांची मा.अधिष्ठाता यांच्या अंतर्गत स्थानिक निवड समिती मार्फत मुलाखती घेवुन उपस्थित पात्र उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे.

मुलाखतीचा पत्ता:- महाविद्यालयीन परीषद,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, आय.टी.आय. परिसर, परभणी.

सदर पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

पद :- निवासी वैद्यकीय अधिकारी एकूण = २ पदे रिक्त पदाच्या संख्येत कमी जास्त होवु शकते.

१. प्रथम, व्दितीय, तृतीय व अंतिम वर्ष एम.बी.बी.एस.उत्तीर्ण गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र.

२. Attempt Certificate, जात व जात वैधता प्रमाणपत्र,नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र (लागु असल्यास), रहिवाशी प्रमाणपत्र,अनुभवाचे प्रमाणपत्र. अपंगत्व असल्यास अपंग प्रमाणपत्र.

३. एम.एम.सी. रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण नोंदीसह.

४. Internship Completion Certificate.

५. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, दहावी, बारावी उर्तिण प्रमाणपत्र. आधार कार्ड, पॅन कार्ड,

६. या संस्थेत कार्यरत निवासी वैद्यकीय अधिकारी संपुर्ण कागदपत्रे/प्रमाणपत्रे नव्याने सादर करावे कोणत्याही परिस्थितीत त्यांचे संस्थेत जमा असलेले प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती काढण्यासाठी त्यांना दिले जाणार नाही.

सदर पदासाठी मुलाखतीसाठी हजर राहताना वरील प्रमाणे आवश्यक कागदपत्रे बाबतचा तपशिल या कार्यालयाच्या संकेतस्थळ www.gmcparbhani.org यावर टाकण्यात येत आहे. या संबंधी काही शंका असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.मोबाईल क्र. ९९७५३३०२३६,९४०३६१८९६९

सदर पद भरतीत पदांची संख्या कमी किंवा जास्त करण्याची व आदेश निर्गमित करण्याचे बाबतचे सर्व अधिकार मा. अधिष्ठाता यांनी राखुन ठेवले आहे.

(डॉ. विश्वजीत पवार)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, परभणी.

प्रत,

मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहिती स्तव व मान्यतेसाठी सविनय सादर.